• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३३२ • सोमवार,दि. ४ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 332 • Monday 4 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# भाजप निवडणूक प्रक्रियेत घोटाळा करून जिंकेल –ठाकरे

**मुंबई । वृत्तसेवा**

**लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने रणशिंग फुंकलं आहे. जागावाटपाबाबतचा तिढा सोडवण्यासाठी भाजपने काल शनिवारी १६ राज्यांत आणि २ केंद्रशासित प्रदेशात एकूण १९५ उमेदवारांची यादी घोषित केली. परंतु, माजी मुख्यमंत्री ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत भाजपवर तोफ डागली आहे. बेहिशेबी संपत्ती गोळा केल्याचा आरोप असलेल्या सिंह यांना भाजपने उमेदवारी दिलीय. पहिल्या यादीत गडकरींचं नाव नाही, सिंह यांचं नाव आहे. ईव्हीएमचा घोटाळा करुन भाजप जिंकलं तर देशात मोठा असंतोष निर्माण होईल, अशी घणाघाती टीका ठाकरे यांनी भाजपवर केलीय.**



पत्रकार परिषदेत ठाकरे यांनी भाजपवर टीकेची झोड उठवली. भाजपवर आरोप करत ठाकरे म्हणाले, आपण जनतेच्या सोबत आहोत. ईव्हीएमच्या माध्यमातून संभ्रम पसरवला जात आहे. ईव्हीएमचा गैरवापर करून भाजप जिंकलं तर देशात असंतोष निर्माण होईल. बेहिशेबी संपत्ती गोळा केल्याचा आरोप सिंह यांच्यावर आहे. पहिल्या यादीत नितीन गडकरी यांचं नाव नाही, पण सिंह यांचं आहे. तोडा, फोडा, राज्य करा ही भाजपची नीती आहे. ज्यांच्यावर आरोप केले त्यांनाच भाजपने उमेदवारी दिली आहे. पण आम्ही जनतेच्या सोबत आहोत. आमच्यावर जनतेचा विश्वास आहे. भाजपने जाहीर केलेल्या या यादीत ३४ केंद्रीय मंत्री, राज्यमंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा वारणसी येथून उमेदवारी लढवणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री गुजरातच्या गांधीनगरमधून निवडणूक लढवणार असून संरक्षणमंत्री राजनाथ सिंह लखनऊ येथून निवडणुकीला उभे राहणार आहेत. भाजपने जागावाटपाचा तिढा सोडवण्यासाठी पहिली यादी जाहीर करून लोकसभेच्या निवडणुकीसाठी रणशिंगक फुंकलं आहे. आता या युतीच्या सरकारच्याविरोधात आघाडी सरकार कशाप्रकारे रणनीती आखेल, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.



बीड – आ.संदीप क्षीरसागर बीड मतदार संघातील दौऱ्यावर असताना शिरापुर गावाच्या ग्रामस्थानी रस्त्याबाबत समस्या मांडल्या. ग्रामस्थांना रस्त्याचा प्रश्न सोडण्याचा शब्द यावेळी बीड मतदार संघाचे लोकप्रिय आ. संदीप क्षीरसागर यांनी दिला.

## महाराष्ट्रात भाजपसाठी लोकसभा निवडणुका कठीण

**मुंबई । वृत्तसेवा**

भाजपने आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या पहिल्या यादीत महाराष्ट्रातील उमेदवारांना स्थान मिळालेले नाही. ती बाब महाराष्ट्रातील स्थिती भाजपसाठी आव्हानात्मक असल्याचे सूचित करते, असे राजकीय विश्लेषकांना वाटत आहे. उत्तरप्रदेशात लोकसभेच्या सर्वाधिक ८०, तर त्याखालोखाल महाराष्ट्रात ४८ जागा आहेत. भाजपच्या पहिल्या यादीत उत्तरप्रदेशातील तब्बल ५१ उमेदवारांचा समावेश आहे. मात्र, महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराचे नाव त्या यादीत समाविष्ट करण्यात आलेले नाही. त्यामुळे भुवया उंचावल्या गेल्या आहेत. अर्थात, महाराष्ट्रात भाजप सत्तारूढ महायुतीचा घटक आहे. त्या महायुतीचे जागावाटप अद्याप अंतिम झालेले नाही. त्या कारणामुळे भाजपने पहिल्या यादीत महाराष्ट्रातील उमेदवारांचा समावेश टाळल्याचे मानले जात आहे. महाविकास आघाडीचे मोठे आव्हान महायुतीपुढे उभे राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## गोळीबार करून जिवे मारण्याचा प्रयत्न

**जामखेड । प्रतिनिधी**

दीड वर्षांपुर्वी जामखेड पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल केल्याच्या कारणावरून जामखेड तालुक्यातील पाटोदा गरडाचे येथे मुकादमावर गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात मुकादम जखमी झाला असून याप्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला दोघांवर जीवे मारण्याचा प्रयत्न व आर्म क्ट नुसार जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की घटनेतील फीर्यादी आबेद बाबुलाल पठाण रा. गरडाचे पाटोदा हे ऊसतोड कामगारांचे मुकादम आहेत. याच्याकडे लक्ष्मण कल्याण काळे रा.जामखेड हा ऊसतोड मजुर म्हणून कामाला होता. मजुर लक्ष्मण काळे यास आर्थिक कारणावरून दिड वर्षांपुर्वी यातील आरोपी अक्षय उर्फ (चिंग्या) विश्वनाथ मोरे, रा. पाटोदा गरडाचे याने मारहाण केली होती. त्यामुळे आरोपी विरोधात दिड वर्षांपुर्वी जामखेड पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली होती. याचाच मनात राग धरून दि ३ मार्च रोजी रात्री एक वाजता आरोपी अक्षय ऊर्फ चिंग्या



विश्वनाथ मोरे याने त्याच्या साथीदाराच्या मदतीने फीर्यादी आबेद पठाण यांच्यावर तीन राऊंड फायर केले. यामध्ये एक गोळी आबेद पठाण यांच्या पायाला लागल्याने ते या गोळीबारात जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने नगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गोळीबार झाल्यावर आरोपीने घटनास्थळाहुन पलायन केले असुन तो सध्या फरार आहे. घटनास्थळी तातडीने अप्पर पोलीस अधीक्षक प्रांशांत खैरे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी भेट दिली. आरोपीच्या शोधासाठी तीन पथके तैनात करण्यात आली असुन लवकरच आरोपीला पकडण्यात येईल अशी माहिती अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी दिली. पुढील तपास सपोनि गैतम तायडे हे करत आहेत. गोळीबारातील आरोपी हा दुहेरी हत्याकांडात होता अल्पवयीन आरोपी पाटोदा गरडाचे या ठिकाणी मुकादमावर केलेल्या गोळीबारातील आरोपी अक्षय ऊर्फ (चिंग्या) विश्वनाथ मोरे हा पाच वर्षापुर्वी जामखेड येथे झालेल्या दुहेरी हत्याकांडातील अल्पवयीन आरोपी होता. तो या दुहेरी हत्याकांडातुन निर्देश सुटला होता. मात्र सदर आरोपी हा गुन्हेगारी पाश्र्वभूमीचा असुन त्याच्या विरोधात पोलीस स्टेशनला आनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. पाटोदा गरडाचे या ठिकाणी केलेल्या गोळीबारातील आरोपीस जामखेड येथील एका कलाकेंद्र चालकाचे आशिर्वाद आहेत. सदर आरोपीचा कलाकेंद्र व कलाकेंद्र चालकाच्या सोबत वावर असतो. आरोपी हा गोळीबारानंतर संबंधित कलाकेंद्र चालकाच्या नातेवाईकाची गाडी घेऊन फरार झाला आहे. त्यामुळे पोलिसांनी सध्या चौकशीसाठी दोन तीन जण ताब्यात घेतले आहेत.

## मराठवाड्यातील अल्पशिक्षीत तरूणाने उभारली कंपनी

**परभणी । वृत्तसेवा**

गेल्या काही वर्षांपासून शेती उद्योग प्रचंड प्रमाणामध्ये संकटात सापडलेला आहे. खरीप हंगाम असो किंवा रब्बी हंगाम या दोन्ही कालावधीमध्ये शेतकऱ्यांच्या हातात उत्पादन मिळेल अगदी त्याच वेळेस अवकाळी पाऊस किंवा गारपीट आणि वादळ वाऱ्यांचा तडाखा बसतो व शेती पिके जमीनदोस्त होऊन शेतकरी प्रचंड प्रमाणात आर्थिक संकटात सापडतात. तसेच बाजारपेठेतील शेतीमालाचे घसरलेले दर त्यामुळे देखील शेतकरी प्रचंड प्रमाणात आर्थिक दृष्टिकोनातून त्रस्त आहेत. या अनुषंगाने शेतीमधून तरायचे असेल तर शेतीला प्रक्रिया उद्योगांची जोड देणे खूप गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाच्या काही महत्वाच्या योजनांचा लाभ घेऊन प्रक्रिया उद्योग सुरू करणे ही काळाची गरज आहे. अगदी याच मुद्द्याला धरून जर आपण मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात असलेल्या खाजमापूरवाडी येथील एका तरुणाचा विचार केला तर त्याने केळीपासून चिप्स निर्मिती उद्योग उभारला व अगदी कमी कालावधीमध्ये तो यशस्वी देखील करून दाखवला. दुष्काळी मराठवाड्यातील हिंगोली जिल्ह्यात असलेल्या खाजमापुरवाडी येथील उमेश मुके या तरुणाकडे वडिलोपार्जित सुमारे आठ एकर इतकी जमीन आहे. प्रक्रिया उद्योग सुरू करण्याचे ठरवले व सुरू देखील केला.



## संपादकीय

# प्रकल्पांना गती

शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये नागरिकशास्त्राचा अभ्यास करताना लोकसभा, विधानसभा आणि महापालिका यांचे अधिकार आणि कर्तव्ये बहुतेक सर्व जण शिकलेले असतात. या प्रतिनिधी मंडळांमध्ये काम करणारे खासदार, आमदार आणि नगरसेवक यांच्याकडून कोणती कामे अपेक्षित असतात, हे सुद्धा आपल्याला माहिती असते. दुर्दैवाने, निवडणुकीच्या रणधुमाळीत खासदाराकडून स्थानिक स्तरावरील नगरसेवकांकडून केली जाणारी कामे आणि नगरसेवकांकडून खासदाराच्या अखत्यारित येणाऱ्या कामांची जाहिरातबाजी राजकीय पक्षांकडून केली जाते. मतदार म्हणून आपण त्यावर विश्वास ठेवतो आणि खरे तर फसतोच. खासदाराच्या विकास निधीतून आपल्या परिसरातील एखाद्या व्यायामशाळेचे (ओपन जिम) उद्घाटन, एखाद्या वाचनालयाचे नूतनीकरण, रस्त्यावर सार्वजनिक स्वच्छतागृहांचे बांधकाम अथवा बसथांबे बांधून दिले, की 'खासदार खरेच कामाचा आहे,' अशी भावना होत असेल, तर नागरिकशास्त्राचे पुस्तक पुन्हा अभ्यासायला हवे. कायदेमंडळ म्हणून देशासाठी एखादे धोरण निश्चित करण्यात खासदाराचा सहभाग असतोच. तो सत्ताधारी पक्षाऐवजी विरोधी पक्षात असला, तरी उपयुक्त सूचना करणे खासदाराच्या हाती असतेच. त्याचवेळी केंद्र सरकारकडून जाहीर केल्या जाणाऱ्या विविध योजनांमधून आपल्या मतदारसंघातील विकासकामांना गती देणे अथवा मतदारसंघातील केंद्रीय स्तरावरच्या प्रलंबित कामांसाठी संबंधित मंत्री किंवा मंत्रालयाच्या कामातून निधी मिळविणे, यासाठी दिल्लीत पाठपुरावा केला जाणे अपेक्षित आहे. एखाद्या योजनेसाठी राज्य सरकारची मदत लागते. अशावेळी संबंधित खासदाराने राज्य सरकारच्या माध्यमातून संबंधित योजना अथवा त्याद्वारे उपलब्ध होणारा निधी लवकर प्राप्त व्हावा, याची जबाबदारी घ्यायला हवी. देशभराच्या विविध भागांतील खासदार त्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. पहिल्यांदाच निवडून जाणाऱ्या एखाद्या खासदाराला कदाचित पहिल्या दोन–तीन वर्षांत विविध योजनांसाठी निधी मिळविण्यात अथवा मंत्री–मंत्रालयातील अधिकारी यांच्याशी थेट संपर्क नसल्याने पाठपुरावा करण्यात अडचणी निश्चित येऊ शकतात. मात्र, त्याचसाठी संसद अधिवेशनाच्या कालावधीशिवाय दिल्लीत तळ ठोकून राहणे, पक्षाच्या माध्यमातून अथवा काही वरिष्ठ सहकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन मतदारसंघातील योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे, काही अडचणी असल्यास त्या सोडविणे; अन्यथा थेट संसदेमध्येच प्रश्नोत्तरे, चर्चा या माध्यमातून आवाज उठविणे, अशा विविध माध्यमांतून मतदारसंघातील विकासकामांना गती देता येऊ शकते. या पद्धतीने काम करणाऱ्या खासदारांची संख्या काही कमी नाही. त्यासाठी फक्त राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. न. वि. गाडगीळ, इंदिरा मायदेव, ना. ग. गोरे, शंकरराव मोरे, एस. एम. जोशी, मोहन धारिया, विठ्ठलराव गाडगीळ या सर्वांनी स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या ३५–४० वर्षांमध्ये पुण्याचे प्रतिनिधीत्त्व संसदेत केले आहे. खासदार म्हणून ओळख होण्याआधीच यातील बहुतांश नावांचा देशभरात दबदबा होता. यातील काहींनी केंद्रीय मंत्रिमंडळासह इतर महत्त्वाच्या घटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यानंतरच्या काळात सुरेश कलमाडी हे नावही दिल्लीतील बहुतेकांच्या परिचयाचे होते. केंद्रीय मंत्री आणि ऑलिम्पिक असोसिएशनच्या माध्यमातून दिल्लीतील वरिष्ठ पातळीवरच्या नेत्यांशी कलमाडी यांचे चांगले संबंध असल्याचा फायदा पुण्याला निश्चित झाला आहे, यात शंकाच नाही. अण्णा जोशी, विठ्ठल तुपे, प्रदीप रावत, अनिल शिरोळे आणि दिवंगत खासदार गिरीश बापट यांनी त्यांच्या काळात पुण्यासाठी विविध योजनांद्वारे निधी मिळविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यापैकी अण्णा जोशी आणि विठ्ठल तुपे हे विरोधी पक्षाचे खासदार असल्याने त्यांना सत्ताधारी पक्षाच्या खासदारांच्या तुलनेत विविध योजना किंवा प्रकल्पांसाठी पुढाकार घेण्यात मर्यादा होत्या. राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची संधी पुण्याला मिळाल्याने केंद्र सरकारच्या निधीतून पुण्यात रस्त्यांची खूप कामे २००७च्या दरम्यान झाली. त्यानंतरच्या गेल्या १५ वर्षांमध्ये पुणे मेट्रो प्रकल्प आणि लोहगाव येथील टर्मिनलचे विस्तारीकरण या दोन प्रकल्पांचा अपवाद वगळता पुण्यामध्ये केंद्राच्या योजनेतून भरीव कामे झाल्याचे दिसून येत नाही. मुळा–मुळा नदी शुद्धिकरण प्रकल्पासाठी केंद्र सरकारने अनुदान दिले असले, तरी दोन खासदारांच्या पूर्ण टर्म संपूनही हे काम अजूनही पूर्णत्त्वास गेलेले नाही. देशात सर्वाधिक गाजावाजा झालेल्या 'स्मार्ट सिटी' योजनेत पुणे दुसऱ्या क्रमांकावर होते. त्यात ठरविलेली किती कामे पूर्ण झाली, याचा आढावा खासदारांनी घ्यायचा नाही तर कोणी? केंद्रीय स्तरावर अडकलेले पुण्याशी संबंधित इतरही महत्त्वाचे प्रकल्प आणि योजनांना अपेक्षित गती मिळालेली नाही. खासदार म्हणून विविध राजकीय पक्षांकडून पुढील महिन्यात उमेदवारांची घोषणा होईल. त्यांचा प्रचार सुरू होईल. या प्रचारादरम्यान त्यांच्या पुण्याच्या जाहीरनाम्यात दिल्लीतील कोणत्या प्रकल्पांचा समावेश आहे, हे जरूर तपासा. पुण्याचा खासदार होऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराचा पाच वर्षांचा प्राधान्यक्रम काय असेल? हे विचारण्याचे धाडस पुणेकरांनी दाखवायला हवे आहे. महापालिका आणि राज्य सरकारकडून होणाऱ्या कामांचे आश्वासन तुमचा खासदारकीसाठी उभा राहणारा उमेदवार देणार असेल, तर त्यालाही तुम्ही नागरिकशास्त्राचे पुस्तक भेट देत, त्याच्या कर्तव्यांची जाणीव करून देऊ शकता. पुणे आणि परिसरातील वाढते नागरीकरण, वाढती लोकसंख्या, उद्योग–सेवा व्यवसायांचे निर्माण होणारे जाळे, या परिसरातून केंद्र सरकारच्या तिजोरीत जमा होणार महसूल आणि त्या तुलनेत पुण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजनांसाठी मिळणारा निधी, याचा ताळमेळ साधला जायला हवा. उदाहरणार्थ, पुण्यातून १०० रुपयांचा कर सरकारी तिजोरीत जमा होत असेल, तर अगदी पूर्ण १०० रुपयांची नाही; पण किमान ५० रुपयांची कामे तरी पुणे आणि परिसरात होतात का? यावर पुणेकर मतदारांनी लक्ष ठेवण्याची गरज आहे.

# गडकरींसारख्या निष्ठावंत नेत्याला भाजपनं डावललं– ठाकरे

**मुंबई । वृत्तसेवा**

भाजपने पहिल्या यादीत कृपाशंकर सिंह यांना उमेदवारी दिली आहे. यावरुन उद्धव ठाकरेंनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. भाजपने नितीन गडकरी यांच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्याला डावललं आणि आरोप केले त्याच उमेदवारी दिली, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपवर तोफ डागली आहे. उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे की, तळागाळातल्या शेवटच्या माणसापर्यंत फक्त घोषणा पोहोचतात प्रत्यक्षात मात्र काही नाही. तिथूनच या यात्रेची तुम्ही सर्वांनी सुरुवात केली. या सर्वांचे शिखर खोट्यावर आधारित आहे. जनतेपर्यंत आपण हे सगळं पोहोचवू यासाठी आपण एक शिबिर घेऊ. गडकरींसारखा निष्ठावंत कार्यकर्ता भाजपामध्ये दशकानुदशके आहे, पण त्यांचं नाव पहिल्या यादीत नाही. मात्र ज्यांच्यावर आरोप केले, त्यांनाच भाजपने उमेदवारी दिली, असं म्हणत उद्धवे ठाकरेंनी भाजपावर हल्ला चढवला आहे. पंतप्रधानांचा फोटो लावून अनेक



योजना आहेत. मात्र त्या प्रत्यक्षात कुठेही पोहोचत नाही. मी सगळ्यांशी बोलतोय त्यामध्ये वरपासून खालपर्यंत सगळे नाराज आहेत, असंही त्यांनी सांगितलं आहे. उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधत सांगितलं की, 'डोळे असून काही अंधभक्त आहेत ते सोडून द्या. सर्वांमध्ये असंतोष आहे. ईव्हीएमने हे जिंकू शकतात. ईव्हीएममुळे हे जिंकत आहेतच, मात्र आता हे जिंकणार नाहीत, असा गैरसमज पसरवत आहेत. जनता हा लोकशाहीला सर्वात मोठा घटक आहे. जनतेच्या मनाविरुद्ध तोडाफोडाचे राजकारण भाजप करत आहेत. जनतेचा असंतोष असताना देखील ईव्हीएमच्या मदतीने हे जिंकले तर वाईट आहे.' भाजपवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, '१९५ लोकांची यादी जाहीर केली. नितीन गडकरी यांचं मी सुरुवातीपासून नाव ऐकतोय, ज्या वेळेला मोदी, शाह यांची नावे ऐकली नव्हती. अशा माणसाचं नाव या यादीत नाही आहे. ज्या कृपाशंकर सिंहांवर यांनी आरोप केले त्यांचे या पहिल्या यादीत नाव आहे. शहरात जुन्या योजनांची नावे देखील बदलली. जुमलाचं नाव आता गॅरंटी झालेलं आहे.' ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान आवास योजना अशी तुमच्या झोपड्यांची पुन्हा जाहिरात व्हायची. लोकांच्या सहनशीलतेचा अंत होण्याआधी तुम्ही सर्वत्र जाऊन त्यांना धीर दिलात, त्याबद्दल सर्व संवाद यात्रेकरूंचे उद्धव ठाकरे यांनी आभार मानले. आता तुम्ही सर्वांनी पायी प्रवास केलात हाच प्रवास आपल्याला दिल्लीच्या दिशेने करायचा आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे. मातृत्व ते शिवतीर्थ हा मुक्त संवाद यात्रा मातृत्व ते शिवतीर्थ हा मुक्ता संवाद यात्रेच्या समारोपाच्या निमित्ताने पक्षाप्रमुख उद्धव ठाकरे शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे आणि काही पदाधिकारी यांनी मातोश्री येथे पत्रकार परिषद घेतली. सुषमा अंधारे यांनी यावेळी सांगितलं की, मातृत्व ते शिवतीर्थ हा मुक्त संवाद २० जानेवारीपासून राज्यभर सुरू झाला. यामध्ये राज्यातील वेगवेगळ्या प्रश्नांविषयी आम्ही जाणून घेतल. एकूण १३ लोकसभेमध्ये आणि ३४ विधानसभेत आम्ही फिरलो. आम्ही या अभियानात बुलढाणा आणि लोणार भागामध्ये फिरलो. जर समृद्धी महामार्ग ३८ किलोमीटर त्या भागामधून गेला असता तर त्यांना रोजगार मिळाला असता, अशी त्या लोकांची भावना आहे. आम्हाला कर्जमाफी मिळत नाही, असं लोकांचं म्हणणं आहे. लोकांपर्यंत कोणत्याच योजना पोहोचत नाही, ना शासन आपल्या दारी ना काही, असं म्हणत सुषमा अंधारेंनी सरकारवर निशाणा साधला आहे.

# भाजपने संविधानच खुंटीला टांगले

**मुंबई । वृत्तसेवा**

काँग्रेसच्या काळातील गृह खाते आणि आताच्या भाजपच्या (इगझ) काळातील गृह खाते यात जमीन–आसमानचा फरक आहे. आम्ही संविधान आणि राज्यघटना याचा आदर करून काम करायचो. आता संविधानच खुंटीला टांगलेला असून संविधानाच्या विरोधातच सर्व काम चालू आहे. सोबतच अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावल्या गेले असल्याचा आरोप माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांनी सत्ताधाऱ्यांवर केला आहे. सध्या कोणी सरकारच्या विरोधात बोलले तर इडी, सीबीआय, इन्कम टॅक्स यांचा धाक दाखून एक तर पक्षात ये, नाहीतर जेल मध्ये टाकू. असे तोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. हा काँग्रेस आणि भाजप मधील फार मोठा फरक असून राज्यात गुंडशाहीचे राजकारण सुरू असल्याची घणाघाती टीका देखील रमेश बागवे यांनी भाजपवर केली आहे. विद्येचे माहेर घर असलेले सुसंस्कृत पुण्यामध्ये मधल्या काळात कोयता गँगचा सुळसुळाट होता. त्यापाठोपाठ आता त्याच पुण्यात मोठ्या प्रमात ड्रग्सचे मोठे घबाड उघडकीस आले आहे. त्याचा थेट संबंध हा आंतरराष्ट्रीय टोळीशी जुळला असल्याने राज्यसह पुण्याचे नाव देखील बदनाम झाले आहे. हे सर्वप्रकार आज गृहखात्याच्या बेजवाबदारपणामुळे होत आहेत. गृहखाते ज्यांच्याकडे आहे, त्यांचे याकडे आजिबात लक्ष नसल्यामुळे असे प्रकार घडत असल्याचे म्हणत माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केले आहे. पुण्यात आज देशभरातून शिक्षण, निकरीसाठी तरुणाई येत असते. मात्र आज त्या पुण्यात ड्रग्स आणि अमली पदार्थांच्या घटना घडत आहे. असे असतांना ससून रुग्णालयात एका ड्रग्स माफियाल कशी वागणूक देण्यात येते, म्हणजे पोलीस खाते झोपले आहे का, असा प्रश्न देखील रमेश बागवे यांनी उपस्थित केला. आमच्यावेळी गृहखात्यावर आमचे पूर्ण नियंत्रण होते. कोणी असे दोषी आढळून आल्यास आम्ही तत्काळ शासन केल्या जात होतो. मात्र आताच्या गृहखात्याचे हे अपयश असल्याने अशा प्रकार घडत असल्याचे देखील रमेश बागवे म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण मिळावं अशी आमची पण इच्छा आहे. पण राज्यात असलेलं तीन इंजिनचं सरकार हे दोन जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचं काम करीत आहे. निवडणुकीपूर्वी पंतप्रधानांपासून तर मुख्यमंत्र्यांनी मोठ–मोठे आश्वासन दिले. आम्हाला सत्ता द्या आम्ही मराठा आरक्षण देऊ. सोबतच धनगर, मुस्लिमांना देखील आरक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कुणाला आरक्षण मिळाले नाही. कुणाच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण या सरकारने दिली पाहिजे. अशी आमची भूमिका असल्याचे देखील रमेश बागवे म्हणाले.

## ग्रामसेवकाकडून ९ अपहार

औंढा – तालुक्यातील पोटा बु. येथील ग्रामपंचायतीत ग्रामसेवकाने ९ लाख ४१ हजार ३१६ रुपयांचा अपहार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी सरपंचाने ७ फेब्रुवारीरोजी तक्रार केली होती. औंढा नागनाथ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी अपहाराची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. विस्तार अधिकारी सय्यद जमीर चौकशी करणार आहेत. पोटा बुद्रुक येथील ग्रामपंचायतीचे महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या औंढा नागनाथ शाखेत खाते आहे. या खात्यातून ग्रामसेवकाने ९ लाख ४१ हजार ३१६ रुपये अपहार करून स्वतःच्या वैयक्तिक खात्यामध्ये जमा करून घेतले. या प्रकरणी सरपंच यांनी ७ फेब्रुवारीरोजी गटविकास अधिकारी व वरिष्ठांकडे तक्रार केली. तर ग्रामसेवकाने याप्रकरणी पुन्हा ८ फेब्रुवारीरोजी वेगळी तक्रार केली आहे.

# अल्पवयीन मुलीची तस्करी करणाऱ्या महिलेला सात वर्षे कारावास

**नागपूर । वृत्तसेवा**

देहव्यापाराकरिता अल्पवयीन मुलीची तस्करी करणाऱ्या महिलेला दोषी ठरवत कमाल सात वर्षे सश्रम कारावास आणि एकूण पाच हजार ५०० रुपये दंड, अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. विशेष सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस. ए. श्रीखंडे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिलाय. सीमा प्रेमलाल छाडी (४०) असे या महिला आरोपीचे नाव असून ती नागपूरातील गंगा जमुना वस्तीमधील रहिवासी आहे. तर यातील पीडित मुलगी पोलीस तक्रारीच्या वेळी १४ वर्षाची होती. मात्र ज्यावेळी ती अवघ्या चार वर्षांची असताना तीचे अपहरण करण्यात आले होते. प्रकरणातील पीडित मुलगी चार वर्षांची असताना एका अज्ञात आरोपीने खेळणी देण्याचे आमिष दाखवून तिला सोबत नेले होते. त्यानंतर तिला नागपूरसह विविध ठिकाणी ठेवण्यात आले. दरम्यान ९ मे २०२२ ला प्रकरणातील दोषी महिला आरोपी नीलम छाडीने पीडित मुलीला जबर मारहाण केली. त्यामुळे मुलीने संधी साधून पळ काढला आणि थेट पोलीस स्टेशन गाठले होते. त्यानंतर तिने तिच्यासोबत घडलेला संपूर्ण प्रकार लकडगंज पोलिसांना सांगितला होता. यावर पोलिसांनी पीडित मुलीची तक्रार दाखल करून संबंधित संशयित आरोपींविरोधात गुन्हा दखल केला होता. त्यानंतर या प्रकरणी विशेष सत्र न्यायालयाने संशयित आरोपीविरुद्ध १२ साक्षीदारांचे बयाण तपासून गुन्हे सिद्ध केले आहे. न्यायालयात सरकारच्या वतीने ॲड. सोनाली राऊत यांनी कामकाज पाहिले. तर न्यायाधीश एस. ए. श्रीखंडे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिलाय. मोबाइल चॅटिंग पालकांना दाखविण्याची धमकी देत एका १५ वर्षीय मुलीवर अत्याचार करण्यात आला. ही घटना यशोधरानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. अनिकेत हंसराज खोब्रागडे (२१, रा. कामठी) असे या प्रकरणातील संशयित आरोपीचे नाव आहे. गेल्या काही महिन्यापूर्वी त्याची १५ वर्षीय मुलीशी ओळख झाली होती. दरम्यान त्याने मुलीशी जवळीक साधत तिच्याशी चॅटिंग सुरू केले. त्यात काही अश्लील चॅटिंगदेखील होते. ते चॅटिंग तिच्या पालकांना दाखविण्याची धमकी देत अनिकेतने तिच्यावर अत्याचार केला. हा प्रकार २७ फेब्रुवारी रोजी घडला. त्यानंतर मुलीने धाडस करत या प्रकाराची माहिती पालकांना दिली असता मुलीच्या आईने तत्काळ यशोधरानगर पोलीस स्टेशन गाठून अनिकेत विरोधात तक्रार केली. या तक्रारी वरून पोलिसांनी अनिकेत विरोधात गुन्हा नोंदवत त्यांला अटक केली.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एस. एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश.व स्तर बीड यांच्या न्यायालयात, किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३४५/२०२४**

**पोपट मोहन जाधव व निरंक**

**अर्जदार – १) पोपट पि. मोहन जाधव, वय ६६, धंदा शेती, रा. लोणीघाट, ता.जि.बीड, २) मिना भ्र. धनराज डोके, वय ५७, धंदा घरकाम, रा. नागोबा वस्ती देवंग्रा, ता.भूम, जि.उस्मानाबाद, ३) राजेश्री भ्र. मधुकर वारे, वय ५१, धंदा घरकाम, रा. रत्नापूर, ता.जामखेड, जि. अहमदनगर.**

**विरूध्द निरंक**

**प्रकरण – भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मोहन पि. किसन जाधव** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. **मयत मोहन पि. किसन जाधव** हे दिनांक २८/०७/२००३ रोजी राहते घरी लोणीघाट, ता.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र. २ व ३ ह्या मयताच्या विवाहित मुली आहेत. मयताची पत्नी तसेच मयताचे आईवडील बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. या अर्जदाराशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत तसेच त्यांच्या स्थावर व जंगम मिळकतीसंबंधी मृत्यूपत्र बनवलेले नाही अथवा कोणालाही नामनिर्देशीत केलेले नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी . जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याने वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख ०४/०४/२०२४**

**आज दिनांक २६/०२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

**क.लि.**

कोर्टाचा शिक्का

**आदेशावरून.**
**स्वाक्षरीत/–**
**अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.**

**मार्फत**
**ॲड. टी.व्ही.जाधव**

# शाळांच्या सर्वांगिण विकासासाठी नियमित उपक्रम राबवणार -मंत्री दिपक केसरकर



**मुंबई । वृत्तसेवा**

राज्यातील शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात राज्यस्तरीय प्रथम पारितोषिक शासकीय शाळा गटात वाशिम जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा साखरा आणि खाजगी शाळा गटात नाशिक जिल्ह्यातील एस्पेलियर हेरिटेज स्कूल (बेळगाव ढगा) शाळेने पटकावले आहे. शासकीय गटात द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हेदवली (ता. कर्जत जि. रायगड), तृतीय क्रमांक जिल्हा परिषद शाळा घालेवाडी (ता. कवठेमहांकाळ जि. सांगली.) यांनी मिळविला तर खाजगी शाळा गटात शारदाबाई पवार विद्यानिकेतन, शारदानगर (ता. बारामती जि. पुणे) द्वितीय आणि भोंडवे पाटील शाळा बजाजनगर (ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर) शाळेने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषदेत या पारितोषिक विजेत्या शाळांची माहिती दिली. पारितोषिक प्राप्त शाळांना येत्या ५ मार्च रोजी आयोजित समारंभात पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमांत १ लाख ३ हजार ३१२ शाळा सहभागी झाल्या. यामध्ये ६४ हजार ३१२ शासकीय शाळा आणि ३९ हजार खाजगी शाळांचा समावेश आहे. या शाळांमधील १ कोटी ९९ लाख ६१ हजार ५८६ विद्यार्थी सहभागी झाले. यामध्ये १ कोटी ४ लाख ६४ हजार ४२० विद्यार्थी व ९४ लाख ९७ हजार १६६ मुलींचा सहभाग होता. राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवलेल्या शाळेस ५१ लाख, द्वितीय क्रमांक २१ लाख आणि तृतीय क्रमांकाच्या शाळेस ११ लाखाचे पारितोषिक देण्यात येणार आहे. या अभियानात राज्यस्तरावर–१, बृहन्मुंबई मनपा–१, अ व ब वर्ग मनपा–१, विभागस्तरीय–८, जिल्हास्तरीय–३६, तालुकास्तरीय–३५८ अशी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका व 'अ' व 'ब' वर्ग महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रातील शाळांना पहिले २१ लाख, दुसरे ११ लाख व तिसरे पारितोषिक ७ लाख रूपयांचे असेल. ८ विभागीय स्तरावर पहिले २१ लाख, दुसरे ११ लाख, तिसरे ७ लाख रूपयांचे, जिल्हास्तरावर पहिले ११ लाख, दुसरे ५ लाख, तिसरे ३ लाख रुपये तर तालुकास्तरावर पहिले ३ लाख, दुसरे २ लाख, तिसरे १ लाख रुपये, अशी ६६ कोटी १० लाखाची बक्षिसे देण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री श्री. केसरकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणासाठी तसेच शैक्षणिक गुणवत्ता विकसित होण्यासाठी 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' हा उपक्रम नियमितपणे राबविण्यात येईल, असेही मंत्री श्री. केसरकर यांनी सांगितले. ते म्हणाले, शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्याचा निर्णय घेऊन 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हा उपक्रम राज्यात प्रथमच राबविण्यात आला. या उपक्रमातून शाळांच्या बाह्य घटकांसोबत व आंतर घटकांवर देखील प्रभावी काम करण्यात आले.

# महाविकास आघाडीचे लोकसभा उमेदवार निश्चित

**मुंबई । वृत्तसेवा**
लोकसभा निवडणूकीचे पडघम वाजू लागले आहेत. एकीकडे सत्ताधारी भाजपाने आपली देशभरातील १९५ उमेदवारांची यादी जाहीर करीत आघाडी घेतली आहे. मात्र महाराष्ट्रातील उमेदवारांवर अजून निर्णय घेतलेला नाही. तर महाराष्ट्रातील विरोधी महाविकास आघाडीच्या ४८ पैकी ४२ उमेदवार मात्र जवळपास निश्चीत झाले आहेत. मुंबईतील लोकसभेच्या सहापैकी चार जागा ठाकरे गट लढविणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. कल्याण लोकसभा मतदार संघातून आदित्य ठाकरे यांना उभे करण्याची शिवसेना उद्धव ठाकरे गटाची तयारी सुरु आहे. तर ठाणे येथून राजन विचारे, मुंबई-दक्षिण येथून अरविंद सावंत, मुंबई दक्षिण-मध्य येथून देसाई, मुंबई उत्तर पश्चिममधून अमोल कीर्तीकर, पालघरमधून भारती कामडी यांच्यानावावर शिक्कामोर्तब झाल्याचे सांगण्यात येते. संभाजीनगर येथून खैरे, नाशिक येथून करंजकर, रायगडमधून अनंत गीते, रत्नागिरी-सिंधुदुर्ग येथून , मावळ मधून संजोग वाघेरे, खेडेकर यांना तिकीट मिळण्याची शक्यता आहे. वाशिम-यवतमाळ- देशमुख, परभणी- , शिर्डी-भाऊसाहेब वाकचौरे, धाराशिव- निंबाळकर, जळगाव-हर्षल माने, हिंगोली-नागेश आष्टिकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# लोकसभांसाठी ठाकरे गटाकडून मोर्चेबांधणी

**मुंबई । वृत्तसेवा**
लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले असताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या पनवेल, उरण आणि कर्जत विधानसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे यांचा दौरा आखण्यात आला आहे. सोमवार, ४ मार्च रोजी उद्धव ठाकरे हे एकाच दिवशी जनसंवाद मेळावे घेणार आहेत. रायगड आणि पुणे जिल्ह्यांतील सहा विधानसभा मतदारसंघ एकत्र करून नव्याने मावळ लोकसभा मतदारसंघाची निर्मिती झाली. मतदारसंघ अस्तित्वात आल्यापासून येथे शिवसेनेचा भगवा फडकला आहे. राष्ट्रवादीची ताकद असतानाही शिवसेनेच्या खासदाराचा विजय झाला. परंतु शिवसेनेत पडलेल्या दोन गटानंतर खासदार श्रीरंग बारणे यांनी शिंदे गटात जाण्याचा निर्णय घेतल्यामुळे मावळवर पुन्हा शिवसेनेचा झेंडा रोवण्याचे आव्हान ठाकरे गटाच्या शिवसेनेपुढे उभे आहे. मावळ मतदारसंघातील कर्जत येथे नुकताच भाजपचा मेळावा पार पडला. मावळमध्ये भाजपचा खासदार निवडून गेला पाहिजे, असा निर्धार व्यक्त करण्यात आला. प्रभारी प्रमोद सावंत यांनी मात्र आपल्याला देशात ४००पेक्षा जास्त खासदार निवडून आणण्यासाठी येईल त्या उमेदवाराचे काम करायचे असल्याचे सांगून या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. दुसरीकडे, हा मतदारसंघ कायम ठेवण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही कंबर कसली आहे. उद्धव ठाकरे यांचे सोमवार, ४ मार्च रोजी जनसंवाद मेळावे होत आहेत. दुपारी तीन वाजता उद्धव ठाकरे पनवेलमध्ये ठाणा नाका येथे असतील. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता सतीश झाकोटिया मैदान, खोपोली आणि सायंकाळी सात वाजता नवीन शेवा मैदान उरण येथे जनसंवाद मेळावे होणार आहेत. तळोजा येथे शिवसेना नेते बबन पाटील यांच्या बाळासाहेब पाटील विधी महाविद्यालयाचे उद्घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. त्यामुळे ठाकरे यांची पनवेलमध्ये दोन कार्यक्रमांना उपस्थिती असणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण रायगडात जनसंवाद मेळावे घेतल्यानंतर उद्धव ठाकरे पहिल्यांदाच पनवेलमध्ये येत असल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे.

# मराठी पत्रकार परिषदेची नागपूर विभागाची बैठक

**नागपूर । प्रतिनिधी**
नागपूर येथे शनिवारी आधीस्विकृती समितीची बैठक घेण्यात आली .या बैठकीनंतर मराठी पत्रकार परिषद नागपूर विभागाची बैठक घेण्यात आली. या बैठकीला पूर्व नागपूर विभागातील पूर्व विदर्भातील सर्व जिल्ह्याचे प्रतिनिधी जिल्हा जिल्हाध्यक्ष तालुका अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीमध्ये पत्रकारांच्या विविध प्रश्नावर चर्चा झाली. याच वेळी पत्रकारांचे सदस्य संख्या वाढण्यावर भर द्यावा असेही या बैठकीत नमूद करण्यात आले. या बैठकीला मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख,विश्वस्त किरण नाईक, जिल्हा अध्यक्ष शरद पाबळे,



महिला जिल्हाध्यक्ष जान्हवी पाटील, महिला पदाधिकारी शोभा जयपुरकर ,राज्यउपाध्यक्ष शिवराज काटकर आदींची प्रमुख उपस्थिती होती . यावेळी बोलताना परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी पत्रकारांच्या सर्व प्रश्नावर सांगोपांग आपले विचार मांडले. पत्रकारांच्या पेन्शनचा प्रश्न ,आधी स्विकृतीचा प्रश्न पत्रकारांच्या आरोग्याचा प्रश्न, पत्रकारांवरील हल्ले रोखण्यासाठी पत्रकार संरक्षण कायद्याचा प्रश्न आधी प्रश्नावर त्यांनी सविस्तर विवेचन केले .यावेळी परिषदेचे विश्वस्त किरण नाईक , राज्यअध्यक्ष शरद पाबळे महिला अध्यक्षा जान्हवी पाटील शिवराज काटकर, चंद्रपूरचे गोपाल रायपुरे आदींनीही आपले विचार मांडले. शेवटी आभार अविनाश भांडेकर यांनी मानले या बैठकीला नागपूर , भंडारा गडचिरोली चंद्रपूर ,वर्धा आदी जिल्ह्यातून मोठ्या संख्येने मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष, तालुका अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाकरे गटाच्या अनिल देसाईला समन्स

**मुंबई । वृत्तसेवा**
शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल देसाई यांना मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने चौकशीला हजर राहण्याचं समन्स बजावलं आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला खरी शिवसेना घोषित केल्यानंतर सुद्धा उद्धव ठाकरे गटाकडून पक्ष निधीमधून ५० कोटी रुपये काढण्यात आले. त्याबाबत एकनाथ शिंदे यांनी एजथकडे तक्रार केली होती. त्यानंतर आता अनिल देसाई यांना चौकशीसाठी बोलावण्यात आलं आहे. अनिस देसाई यांना येत्या ५ मार्चला चौकशीसाठी हजर राहण्याचं समन्स बजावण्यात आलं आहे. अनिल देसाई चौकशीला सामोरं जातात का, ते पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि महत्त्वाच्या नेत्यांनी मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेतली होती. शिवसेना पक्षाचा निधी ठाकरे गटाकडून वापरला जात आहे. या प्रकरणी चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. या प्रकरणानंतर मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून या सगळ्या प्रकरणाची प्राथमिक चौकशी केली जात आहे. आयकर विभागाकडून यापूर्वी शिवसेना पक्षाच्या निधीच्या अकाउंटची माहिती मागवली होती. त्यानंतर आता पुढील चौकशीला सुरुवात झाली आहे. ठाकरे गटाकडून अनिल देसाई यांना चौकशीला बोलावण्यात आलं आहे. त्यांना ५ मार्चला चौकशीला हजर राहण्याचं समन्स बजावलं आहे. अनिल देसाई हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील महत्त्वाचे नेते आहेत. त्यांनीच शिंदे गटाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. आर्थिक गुन्हे शाखा या प्रकरणी गुन्हा दाखल करतं का ते पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे. मुख्यमंत्र्यांचा याच मुद्द्यावरुन विधानसभेत निशाणा विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतंच विधीमंडळाच्या अधिवेशनात विधानसभेत याबाबत भाष्य केलं होतं. त्यांनी या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता निशाणा साधला होता. आम्हाला खोके खोके म्हणणारे, त्यांनी आमच्याच खात्यातून ५० कोटी घेतले आहेत. त्याची आता चौकशी सुरु आहे. शिवसेनेच्या खात्यातले ५० कोटी घेतले, असा गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. शिवसेना अधिकृतपणे आमच्याकडे आहे, धनुष्यबाण आमच्याकडे आहे. खोके पुरत नाही म्हणून, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत केली होती.

# बीड जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकांना स्थगिती

**बीड । प्रतिनिधी**
पूर्वतयारी कामकाजासाठी लागणारे मनुष्यबळ अधिग्रहित होणार असल्याने राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या अधिनयम, १९६० मधील कलम ७३ क क नुसार सहकारी संस्थांच्या निवहणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील २५५ सहकारी संस्थांची निवडणूक स्थगित झाली आहे. तर विविध प्रकारच्या ३९ सहकारी संस्थांच्या निवडणुका सुरू राहणार आहेत.

# नैतिक जबाबदारीने पारदर्शक आयुष्य जगतो -सुळे

**पुणे । वृत्तसेवा**
तुमचा खासदार हा पारदर्शक आयुष्य जगतो, मी कुठे आहे हे २४ तास तुम्हाला माहिती असतं.. अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी अजित पवार गटाला टोला लगावला. राष्ट्रवादीच्या अजित पवार गटातील नेत्यांकडून सुप्रिया सुळे यांच्या सेल्फी आणि सोशल मीडिया वापरावरून सातत्याने टीका होत असते. त्याच टीकेला अप्रत्यक्षपण उत्तर देतानाच सुप्रिया सुळे यांनी त्यांना टोला हाणला.



बारामतीमधील पार पडलेल्या महारोजगार मेळाव्यामध्ये त्या बोलत होत्या. मी कुठे आहे हे २४ तास तुम्हाला माहीत असतं. माझी पोरं पण म्हणतात, ए बघ जरा आपली आई कुठंय ते.. सोशल मीडियावर दिसतंय आपली आई कुठल्या गावात भाषण करतीय ?.. कारण ही माझी नैतिक जबाबदारी आहे, असं सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या. आपला कारभार पारदर्शक आहे, असे सांगतानाच अप्रत्यक्षरित्या त्यांनी विरोधकांना टोलाच लगावला. हमारी सबसे बडी ताकद, हमारी इमानदारी है. आमचे विरोधकही म्हणतात, की आमचे मनभेद नाहीत आमचे मतभेद आहेत. पण हे दुर्दैव आहे की इतकं दूषित राजकारण आज झालंय, असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. अजित पवार आणि चाकणकर यांच्यासह नेत्यांकडून सातत्याने सुप्रिया सुळे यांच्या सेल्फी आणि सोशल मीडिया वापरावरून टीका होत असते.. त्यावर सुळे यांनी भोर मधील महाविकास आघाडीच्या बैठकीदरम्यान बोलताना अप्रत्यक्षपणे उत्तर दिलंय. यावेळी सुप्रिया सुळे यांनी रोजगार मेळाव्यावर टीकाही केली. लोकसभा निवडणूक आली की हे मोठे मोठे मेळावे घेतात आणि ह्याला खर्च केंद्र सरकार करतं. या सगळ्या मधून जाहिरात कुणाची होत आहे ? तर यांच्या महायुतीची यामध्ये सरकारी यंत्रणेचा गैरवापर हा सातत्याने यांची जाहिरात करण्यासाठी होत आहे. हे मोठं दुर्दैव आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# लातूर जिल्ह्यात आता अन्नदाता करणार क्षयरुग्णांचे पोषण

**लातूर । वृत्तसेवा**
क्षयरोगावर मात करण्यासाठी रुग्णांना औषधींबरोबर सकस आणि प्रथिनेयुक्त आहार महत्त्वाचा असतो. शासनाकडून मोफत औषधी मिळतात. मात्र, आर्थिक अडचणींमुळे पोषक आहार मिळत नाही. परिणामी, घेतलेली औषधी पचत नाहीत. त्यातून रुग्ण आणखीन गळाटतो. दरम्यान, गरजू रुग्णांना पोषण आहार मिळावा म्हणून जिल्हा परिषदेच्या वतीने अन्नदाता उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पहिल्याच टप्प्यात २०० अन्नदाता मदतीसाठी पुढे आले आहेत. क्षयरुग्णांना शासकीय रुग्णालयात मोफत गोळ्या- औषधी दिल्या जातात. तसेच त्यांना पुरेसा, सकस आणि प्रथिनेयुक्त आहार मिळणे आवश्यक असते. जिल्ह्यात सध्या १ हजार ९१० क्षयरुग उपचारावर आहेत. त्यापैकी एक हजारपेक्षा जास्त रुग्णांना सकस आहार मिळत नसल्याने त्यांनी पोषण किट देण्याची मागणी जिल्हा आरोग्य विभागाकडे केली आहे. क्षयरुग्णांना प्रथिनेयुक्त आहार मिळावा म्हणून शासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी शासनाने निक्षय मित्र धोरण अवलंबिले. मात्र, त्यास अपेक्षित यश आले नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेने अन्नदाता उपक्रम हाती घेतला आहे. याअंतर्गत २४ मार्चपर्यंत प्रत्येक रुग्णांना किमान तीन महिने पुरेल इतके धान्य (किट) उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. एक महिन्याच्या किटमध्ये तांदूळ, गहू, ज्वारी यापैकी एक- ३ किलो, कोणतीही दाळ - १.५ किलो, खाद्यतेल- एक पॉकेट आणि शेंगदाणे- १ किलो असणे गरजेचे आहे. जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीतून अन्नदाता हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात म्हणजे एका दिवसात जवळपास २०० जणांनी निक्षय मित्र होत पोषण आहारासाठी अन्नदाता होणार असल्याची नोंदणी केली आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या अन्नदाता उपक्रमात समाजातील दानशूर, नागरिकांनी सामाजिक भावनेतून सहभागी होऊन धान्यरुपी मदत करावी. या उपक्रमासाठी रक्कम देऊ नये. त्याऐवजी धान्य द्यावे. तसेच अन्नदाता कोण आहे, याची माहिती आहे. प्रत्येक निक्षय मित्रास केंद्र शासनाकडून प्रमाणपत्र दिले जाते. क्षयरुग्णांना औषधीबरोबर प्रथिनेयुक्त आहार मिळाल्यास तो लवकर बरा होऊन सर्वसामान्यांप्रमाणे जीवन जगू शकतो. त्यासाठी अन्नदाता उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजातील सेवाभावी संस्था, नागरिकांनी धान्य किट देण्यासाठी पुढे यावे.

## वंचित बहुजन आघाडीकडून लांडगे यांचा सत्कार



बीड -वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश सदस्य युवा पक्षनिरीक्षक लांडगे हे मस्साजोग ता.केज येथे आले असता त्यांचा पक्षातील कार्यकर्त्यांनी पक्ष मजबुत होईल आणि अ‍ॅड. आंबेडकर यांचे हात मजबुत कसे होतील याच दृष्टीकोनातून प्रयत्न करत राहावे. तसेच पक्षातील पदाधिकार्यांचा मानसन्मान पक्षाच्या प्रोटोकॉल प्रमाणे करावे व त्यांचे मार्गदर्शन घ्यावे ज्यामुळे पक्ष संघटन मजबूत होईल. पुर्वीच्या भारीप आणि आताच्या वंचित बहुजन आघाडीसाठी जेष्ठ कार्यकर्त्यांनी उपाशी पोटी राहुन पक्ष संघटन मजबूत केलेले आहे.युवकांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे काम करावे असे लांडगे यांनी वंचित बहुजन आघाडीतील युवकांना मार्गदर्शन केले.

## बारावीचा पेपर देवून परत येणारे विद्यार्थी दुचाकीचा भीषण अपघात ठार

नांदेड - बारावीचा पेपर देवून घराकडे जात असलेल्या दहेली येथील विद्यार्थ्यांच्या दुचाकीला दहेलीनजीक भीषण अपघात झाला. या अपघातात दोन विद्यार्थी ठार तर एकाची प्रकृती चिंताजनक आहे. किनवट तालुक्यातील मौजे दहेली येथील प्रतिक लेंडे, कृष्णा बोंतावार व गणेश तोटावार हे बारावीचे विद्यार्थी मौजे दहेली तांडा येथील महाविद्यालयातील आहे. दरम्यान आज (दि. २ मार्च) रोसकाळी ११ ते २ या कालावधीतील बारावी बोर्डाचा पेपर देवून ते आपल्या गावाकडे निघाले असता दहेली गावा नाजीकच्या एका वळणावर त्यांचे दुचाकी वरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी झाडावर आदळली. यामध्ये प्रतिक लेंडे, कृष्णा बोंतावार, गणेश तोटावार हे तिघेही गंभीर जखमी झाले. त्यावेळी दहेलीचे सरपंच राकेश तोटावर यांनी खासगी वाहनाद्वारे जखमींना दहेली तांडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र गंभीर जखमी असल्याने प्राथमिक उपचारानंतर यवतमाळ येथे हलवण्यात आले. यवतमाळ रुणालयातील डॉक्टरांनी प्रतिक लेंडे व कृष्णा बोंतावार या विद्यार्थ्यांना मृत घोषित केले. तर गणेश तोटावर हा विद्यार्थी जखमी असल्याची माहिती दिली. त्यामुळे संपुर्ण दहेली गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## सर्व पक्षांना भाजप संपवतोय

मुंबई : लोकसभा निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होण्याची शक्यता असतानाच शिवसेना आणि भाजपमध्ये जागावाटपावरून घमासान सुरू झाले आहे. कोकणातील रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघावर भाजपने दावा ठोकल्यानंतर यांनी भाजपला फैलावर घेतले. रत्नागिरीची जागा आमची हक्काची आहे, ती आम्ही सोडणार नाही, असे सुनावत सर्व पक्षांना संपवून भाजपला एकट्यालाच जिवंत राहायचे आहे का, असा संतप्त सवाल त्यांनी केला. पण महायुतीत हे चालणार नाही. रायगड आणि रत्नागिरी-सिंधुदुर्गच्या जागेसाठी भारतीय जनता पक्ष आग्रही आहे म्हणे. दोन्ही जागांवर तुम्ही म्हणाल आम्हीच लढणार ; पण रत्नागिरीची जागा आमची आहे, ती आम्ही सोडणार नाही. ती आमच्या हक्काची जागा आहे आणि ती आम्ही लढविणारच. आताचे जे खासदार आहेत त्यांची शेवटची सभा सावंतवाडी येथे आपण स्वतः घेतली होती. त्यामुळे सर्व पक्षांना संपवून भाजपला एकट्यालाच जिवंत राहायचे आहे, असा निष्कर्ष यावरून निघेल ; पण महायुतीत हे चालणार नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले.


## महाविकास आघाडीचे लोकसभा उमेदवार निश्चित

**मुंबई । वृत्तसेवा**
लोकसभा निवडणूकीचे पडघम वाजू लागले आहेत. एकीकडे सत्ताधारी भाजपाने आपली देशभरातील १९५ उमेदवारांची यादी जाहीर करीत आघाडी घेतली आहे. मात्र महाराष्ट्रातील उमेदवारांवर अजून निर्णय घेतलेला नाही. तर महाराष्ट्रातील विरोधी महाविकास आघाडीच्या ४८ पैकी ४२ उमेदवार मात्र जवळपास निश्चीत झाले आहेत. मुंबईतील लोकसभेच्या सहापैकी चार जागा ठाकरे गट लढविणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते. कल्याण लोकसभा मतदार संघातून आदित्य ठाकरे यांना उभे करण्याची शिवसेना उद्धव ठाकरे गटाची तयारी सुरु आहे. तर ठाणे येथून राजन विचारे, मुंबई-दक्षिण येथून अरविंद सावंत, मुंबई दक्षिण-मध्य येथून देसाई, मुंबई उत्तर पश्चिममधून अमोल कीर्तीकर, पालघरमधून भारती कामडी यांच्यानावावर शिक्कामोर्तब झाल्याचे सांगण्यात येते. संभाजीनगर येथून खैरे, नाशिक येथून करंजकर, रायगडमधून अनंत गीते, रत्नागिरी-सिंधुदुर्ग येथून , मावळ मधून संजोग वाघेरे, खेडेकर यांना तिकीट मिळण्याची शक्यता आहे. वाशिम-यवतमाळ- देशमुख, परभणी- , शिर्डी-भाऊसाहेब वाकचौरे, धाराशिव-निंबाळकर, जळगाव-हर्षल माने, हिंगोली-नागेश आष्टिकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# परळीत येत्या काही महिन्यांतच सुसज्ज क्रीडा संकुल उभारणार -मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

परळीची माती ही रत्नांची खाण आहे या मातीने महाराष्ट्र व देशाला अनेक क्षेत्रात विविध रत्ने दिली आहेत. क्रिकेट सह क्रीडा क्षेत्रातही परळीचे मोठे योगदान आहे. रणजी ट्रॉफीसाठी मराठवाड्याची स्वतंत्र टीम असली असती, तर परळी सह बीड जिल्ह्यातील अनेक खेळाडूंना त्याद्वारे आपली प्रतिभा राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर करण्याची संधी मिळाली असती; ती संधी मिळावी म्हणून दरवर्षी नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपण क्रिकेट व अन्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करतो. याही वर्षी आपण नामदार चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन केले, परंतु पुढील वर्षी ही स्पर्धा स्वतंत्र भव्य स्टेडियम मध्ये होईल; यासाठी राज्य शासनाने सुमारे ६५ कोटी रुपये निधी देण्याचे मान्य केले असून परळीत येत्या काही महिन्यातच सुसज्ज असे क्रीडा संकुल उभे केले जाईल. त्यामध्ये क्रिकेटसह अन्य क्रीडा प्रकारातील खेळांनाही सुसज्ज असे मैदान उभे करून देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे कृषिमंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी येथे बोलताना केली. ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने परळी येथे मागील २५ जानेवारीपासून भव्य टेनिस बॉल डे-नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये परळी शहर तसेच मतदार संघातील ग्रामीण भागातील २६४ क्रिकेट संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा अंतिम सामना आज हजारो क्रिकेट प्रेमींच्या उत्साहात खेळवला गेला व त्यानंतर आयोजित बक्षीस वितरण समारंभात धनंजय मुंडे बोलत होते. या समारंभास खास भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज युवराज सिंग तसेच बॉलिंग ची स्पीड मशीन म्हणून ओळख असलेला स्टार गोलंदाज जहीर खान यांची विशेष उपस्थिती होती. दोघांचेही नाथ प्रतिष्ठानच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी स्थानिक तरुणांनी एकच जल्लोष करत आपल्या लाडक्या खेळाडूंचे जोरदार स्वागत केले. आपल्या शरीरात वाढत असलेल्या कॅन्सरवर मात करून युवराज सिंग ने देशासाठी अनेक रेकॉर्ड स्थापित केले युवराज सिंग आज प्रथमच परळीत आले असता वैद्यनाथ असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या चरणी युवराज सिंग यांना उदंड आयुष्य लाभो अशी प्रार्थना करत असल्याचेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले. मी देखील ग्रामीण भागातून टेनिस बॉल पासून क्रिकेट खेळण्याची सुरुवात केली. हळूहळू संधी उपलब्ध होत गेली आणि देशासाठी खेळायची मला संधी मिळाली. ग्रामीण भागाच्या मातीतूनच योग्य वेळी योग्य संधी मिळाल्याने मोठे खेळाडू निर्माण होत असतात. त्यामुळे माझे मित्र धनंजय मुंडे यांच्यासारख्या नेत्यांनी स्थानिक प्रतिभावान खेळाडूंना योग्य मंच उपलब्ध करून दिल्यानेच ग्रामीण मातीतून युवराज सिंग आणि झहीर खान सारखे खेळाडू घडत असतात असे गौरव उद्गार भारताचे माजी क्रिकेटपटू युवराज सिंग यांनी काढले. मी नगर जिल्ह्याच्या श्रीरामपूर मधून टेनिस बॉल पासूनच सुरुवात केली आणि पुढे खेळत गेलो. परळीत येऊन ग्रामीण भागात क्रिकेटचे एवढे भव्य आयोजन पाहून मला अतिशय आनंद झाला. परळीत खेळले जाणारे हे क्रिकेट एक दिवस देशात आणि देशाबाहेर नक्कीच पोहोचेल, असा मला विश्वास आहे, असे मत यावेळी भूतपूर्व भारतीय क्रिकेटर जहीर खान यांनी व्यक्त केले. गेल्या २५ जानेवारीपासून परळी वैद्यनाथ शहरात धनंजय मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या नामदार चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून तब्बल ३५०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. ही माझ्यासाठी संयोजक म्हणून खूप मोठी बाब आहे, तसेच या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यामध्ये मला अनेकांचे सहभागी लाभले त्या सगळ्यांचेच मी या माध्यमातून आभार मानतो, असे मत यावेळी संयोजकांच्या वतीने जिल्हा परिषदेचे माजी गटनेते मुंडे यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडले. दरम्यान नामदार चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये ग्रामीण व शहर असे दोन वेगवेगळे फायनल खेळवण्यात आले. ग्रामीणमध्ये चांदापूर हा संघ विजेता तर शिवबा गोपीनाथ गड हा संघ उपविजेता ठरला तसेच शहरमध्ये जय श्रीराम संघ विजेता तर जे के सी सी हा संघ उपविजेता ठरला.यावर्षी या स्पर्धेच्या माध्यमातून सुमारे साडेतीन हजार खेळाडूंनी क्रिकेटचा आनंद लुटला. यापैकी परळी मतदारसंघातल्या उत्कृष्ट खेळ दाखवलेल्या ७०० खेळाडूंची निवड करून २० संघांच्या माध्यमातून या खेळाडूंचा लिलाव करून पुढील वर्षी परळी प्रीमियर लीग या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन याहीपेक्षा भव्य स्वरूपात करणार असल्याचीही घोषणा धनंजय मुंडे यांनी यावेळी केली.



## गोरक्षनाथ टेकडीवर कीर्तन

बीड - माघ वदे एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री श्रीक्षेत्र निळकंटेश्वर संस्थान वेदांत नगर यांचे बुधवार दिनांक ६ मार्च २०२४ रोजी रात्री ८ ते १० या वेळेत कीर्तन होणार आहे. यावेळी फराळाचे अन्नदाते राधाकीसन जाधव, रंगनाथ लांडे घाटसावळी तरी या किर्तनाचा व दुसरे दिवशी द्वदशी प्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व दुसरे दिवशी सकाळी द्वदशी पंगतीचे अन्नदाते भीमराव मुकादम, नवनाथ टेलर दामोधरवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे.

## मुकबधीर विद्यालयाचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश

बीड - समाज कल्याण विभाग बीड अंतर्गत जिल्हास्तरीय दिव्यांग स्पर्धेचे आयोजन बीड येथील जिल्हा स्टेडियम येथे दिनांक २२ व २३ फेब्रुवारी २०२४ रोजी करण्यात आले. या स्पर्धेमध्ये बीड जिल्हयातील ४० दिव्यांग शाळांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये आष्टी येथील शाहू महाराज निवासी मुकबधीर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दोन प्रथम क्रमांकाचे व चार तृतीय क्रमांकाचे पारीतोशीक पटकवण्यात यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल जिल्हा समाज कल्याण अधिकारी रविंद्र शिंदे साहेब, वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता नकाते साहेब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे साहेब मुख्याध्यापक काकासाहेब थोरवे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करूण पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तर या विद्यार्थांना मार्गदर्शन करणारे कला /क्रीडा शिक्षक सुधीर तोडकर सांस्कृतीक विभाग प्रमुख संभाजी शिरसाठ, आजबे जोत्स्ना यांनी मार्गदर्शन केले. शाहू महाराज निवासी मुकबधीर विद्यालयातील विद्यार्थीनी जिल्हास्तरीय सांस्कृतीक कार्यक्रमामध्येही सहभाग घेत आपली छाप उमटवली आहे. त्यांच्या यशाबद्दल शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अध्यात्माचे पावित्र्य

केज - नागेशपुरी महाराज व रामकृष्ण महाराजांनी अध्यात्माचे पावित्र्य जोपासले आसल्याचे प्रतिपादन ह.भ.प.महंत भगवान महाराज (शास्त्री) वरपगावकर यांनी श्री.क्षेत्र साधू वरपगाव येथे केले आहे. श्री.क्षेत्र साधू वरपगाव ता केज येथील रामकृष्ण महाराज यांच्या १८ व्या अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या मार्ग दर्शनाखाली २३ फेब्रुवारी ते १माच दरम्यान भव्य दिव्य हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न झाला. भाविक व भक्तगण आणि विशेषःत महिला वर्गाची अलोट गर्दी झाल्यामुळे हा परिसर गजबजून गेला होता.या सप्ताहामुळे अनेक मान्यवरांची अमृततुल्य कीर्तने झाली.

## वडवणीच्या नगराध्यक्षा सौ.वंदना जगताप यांना पुरस्कार

वडवणी - पद्मश्री डॉ.सिंधुताई सपकाळ (माई) सेवारत्न पुरस्कार २०२४ चा वडवणीच्या



नगराध्यक्षा सौ.वंदनाताई शेषेराव जगताप यांना जाहीर झाला आहे. पद्मश्री डॉक्टर सिंधुताई सपकाळ (माई)यांच्या नावाने दिला जाणारा सेवारत्न पुरस्कार २०२४ चा नगराध्यक्षा सौ.वंदना जगताप यांना जाहीर झाला आहे.जागतिक महिला दिनानिमित्त हा पुरस्कार समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना दिला जातो. आजवर केलेल्या सामाजिक आणि राजकीय कामाची दखल घेऊन हा पुरस्कार सौ.वंदना जगताप यांना जाहीर झाला आहे.हा पुरस्कार पसायदान सेवा प्रकल्प वंचितांच हक्काच घर ढेकणमोह ता.जी बीड व स्त्रीशक्ती प्रतिष्ठान बीड यांच्या मार्फत हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराचे वितरण दिनांक ९/३/२०२४ रोजी शनिवारी ४ वाजता पसायदान सेवा प्रकल्प ढेकणमोह या ठिकाणी होणार आहे. तरी परिसरातील आणि पसायदान सेवा प्रकल्पाच्या व स्त्रीशक्ति प्रतिष्ठान बीडच्या सर्व मित्र परिवारांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन पसायदान सेवा प्रकल्पाच्या संचालिका सौ. रंजना गोवर्धन दराडे व स्त्री शक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा जयश्रीताई विलास विधाते यांनी केले आहे.

# आजी-माजी नगरसेवकांचा राष्ट्रवादीत होणार प्रवेश

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष फारुक पटेल, माजी बांधकाम सभापती अमर नाईकवाडे, माजी उपनगराध्यक्ष मोईन मास्टर यांच्यासह बीडमधील अनुभवी आजी-माजी नगरसेवक आणि प्रमुख पदाधिकारी येत्या मंगळवारी (दि.५) पक्षाध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुडे, पक्षाचे जिल्हा सरचिटणीस तथा माजी आ.अमरसिंह पंडीत यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. या प्रमुख पदाधिकार्यांच्या पक्ष प्रवेशामुळे बीड शहरात राष्ट्रवादी कॉंग्रेस मोठी राजकीय ताकद मिळणार आहे. मुंबईत मंगळवारी सायंकाळी पार पडणार्या या पक्ष प्रवेशाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. बीड नगरपालिकेत दीर्घकाळ कामाचा अनुभव असलेले पालिकेचे माजी गटनेते फारुक पटेल यांच्यासह बांधकाम सभापती आणि गटनेते म्हणून काम पाहिलेले अमर नाईकवाडे यांच्यासह मा. उपनगराध्यक्ष मोईन मास्टर, मा. नगरसेवक जलील पठाण, प्रभाकर पोपळे, मा. उपनगराध्यक्ष शेख शाकेर, माजी उपनगराध्यक्ष नसीम इनामदार, भैय्यासाहेब मोरे, माजी सभापती अशफाक इनामदार, गणेश तांदळे, शेख सादेक, माजी जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस अल्पसंख्यांक आघाडी बरकत पठाण, माजी नगरसेवक अक्रम बागवान, ऑल इंडिया मोमीन कॉन्फरन्सचे जिल्हाध्यक्ष शेख सादेक (अंबानी), माजी नगरसेवक शकिल (बिल्डर)खान, माजी नगरसेवक इलियास टेलर, अलिम कुरेशी, शेख युनुस, रफीक बागवान, अय्युब खान, शेख अजिम, सय्यद नदीम, बांधकाम कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष अलिम पटेल, रामदास सरवदे, सय्यद रहीम, संतोष क्षीरसागर, शेख इलियास, संभाजी काळे, भैय्या पवळे, बाळु धोत्रे हे सर्व आजी-माजी नगरसेवक व प्रमुख पदाधिकारी या सर्वांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दर्जेदार विकासकामांचे व्हिजन समोर ठेवून त्यांचे नेतृत्व स्विकारत असून त्यांचा प्रवेश सोहळा मंगळवारी मुंबईत पार पडणार आहे. यापूर्वीही बीड नगर पालिकेत विविध पदांवर काम करताना तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी बीड शहराच्या विकासकामांसाठी नगरोत्थान योजनेतून प्रचंड मोठा निधी दिलेला होता. त्या माध्यमातून नगरपालिकेला शहर विकासाची कामे करता आली आहेत. राज्याच्या विकासाची जाण असणारे आणि कायम सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सकारात्मक भूमिका घेवून जनविकासाची कामे मार्गी लावण्यासाठी कटिबध्द राहणारे हे आहेत. मध्यंतरी पडत्या राजकीय काळात अजित पवार व मंत्री धनंजय मुंडे यांनीच आपल्याला खंबीर साथ दिली. त्यामुळेच त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसची विचारधारा पुढे घेवून जाण्यासाठी आम्ही सर्व सहकारी पक्षप्रवेश करत असल्याचे पदाधिकार्यांनी म्हटले आहे. दरम्यान कृषीमंत्री धनंजय मुंडे, माजी आ.अमरसिंह पंडीत यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी दि.५ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता गरवारे क्लब हाऊस, मुंबई येथे हा पक्षप्रवेश सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडणार आहे.

# आत्मरक्षा प्रशिक्षणातून मुलींमध्ये सक्षमता येते



**आष्टी प्रतिनिधी**

संरक्षण प्रशिक्षणाद्वारे, मुलींनी मानसिक, बौद्धिक आणि शारीरिकदृष्ट्या पुरेसे सक्षम बनवण्याची गरज आहे. जेणेकरून त्या संकटाच्या आणि असुरक्षिततेच्या वेळी स्वतःचे संरक्षण करू शकतील. मुलींना सर्व पैलूंमध्ये सक्षम करणे, कोणत्याही प्रकारच्या कठीण परिस्थितीचा सामना करण्यासाठी मुलींना स्वयं-कौशल्य आत्मविश्वास व जागरूकता विकसित होतेय असे प्रतिपादन विस्तार अधिकारी गंगाखेडेकर यांनी केले ते जिल्हा परिषद शाळा झापेवाडी ता.शिरूर येथे तपासणी साठी गेल्या असता राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण हे शाळेवर नियमीत सुरु आहे असे निदर्शनास आले यावेळी मुलींना त्यांनी आत्मरक्षा प्रशिक्षणाचे महत्व आपल्या मार्गदर्शनातून विशद करताना बोलत होत्या शिरुर तालुक्यातील झापेवाडी जि.प.शाळेत विस्तार अधिकारी गंगाखेडेकर मॅडम २२ फेब्रुवारी २०२४ ला हंगाम तपासणी साठी गेले असता राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण हे शाळेवर नियमीत सुरु आहे असे निदर्शनास आले. मुलींना त्यांनी आत्मरक्षा प्रशिक्षणाचे महत्व आपल्या मार्गदर्शनातून विशद केले पुढे मार्गदर्शन करताना म्हणाल्या की विद्यार्थिनींना गुन्हेगारीविरुद्ध लढण्यासाठी सक्षम करणे हे या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण व संरक्षण तंत्र शिकणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींसाठी हा उपयुक्त संरक्षण तंत्र कार्यक्रम आत्मनिर्भर बनवून तणाव कमी करण्यासाठी त्यांनी स्व-संरक्षण कौशल्ये शिकण्याचा उत्तम मार्ग असेल असे प्रतिपादन केले शाळेचे मुख्याध्यापक परदेशी सर यांनी राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षणामुळे मुलींचा आत्मविश्वास तसेच उत्साह वाढल्याचे सांगितले . परदेशी सर यांनी महाराष्ट्र परिषद शिक्षण मंडळ यांचे आभार मानले .

# सुप्रसिद्ध लेखिका डॉ.किन्हाळकर यांचे व्याख्यान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील सजग अंबाजोगाईकर यांच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच गुरुवार दि ७ मार्च २०२४ रोजी नांदेड येथील सुप्रसिद्ध लेखिका व व्याख्यात्या डॉ. वृषाली किन्हाळकर यांचे सहजीवनातील बदलते भावविश्व या विषयांवर महिलां व पुरुषांसाठी मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन रोटरी क्लब, इनर्व्हील क्लब, मनस्विनी प्रकल्प, शिक्षक मैत्री प्रतिष्ठाण , माहेश्वरी महिला संघटन त्याचबरोबर अंबाजोगाई शहरातील जेष्ठ नागरिक संघ यांनी केले आहे. या सर्वांच्या वतीने



आयोजित व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन मनस्विनी प्रकल्पाच्या डॉ. अरुंधती पाटील यांनी केले आहे.

८ मार्च हा देशभर जागतिक महिला दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात येतो. या दिवशी महिलांच्या सन्मान प्रित्यर्थ सर्वत्र विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. अंबाजोगाई शहरात जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला पुरुष व महिलांसाठी मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित केले आहे. या कार्यक्रमात डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्याकडून सहजीवनातील बदलते भावविश्व या विषयासह महिलांना त्यांच्या दैनंदिन आयुष्यात येणाऱ्या विविध अडचणी , संकटे यावर मात करण्यासाठी यथोचित असे मार्गदर्शन याप्रसंगी केले जाणार आहे. अंबाजोगाई शहर हे सांस्कृतिक वारसा लाभलेले शहर आहे. शहरात वेळोवेळी विद्यार्थीनी, महिला, जेष्ठ नागरिक यांच्यासाठी सदैव शैक्षणिक सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी आयोजित करण्यात येत असते. याच सांस्कृतिक परंपरेचा वारसा पुढे चालविण्याचा प्रयत्न सजग अंबाजोगाईकर म्हणून अंबाजोगाई शहरातील महिला अन्य संघटना या करत आहेत. याचाच एक भाग म्हणून दि ७ मार्च रोजी जागतिक महिला दिनाच्या पूर्वसंध्येला महिलांसाठी मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन मनस्विनी महिला प्रकल्प , संभाजी राजे चौक येथे दुपारी चार वाजता करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा लाभ अंबाजोगाई शहर व परिसरातील सर्वांनी घ्यावा असे अवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.



**बीड - शहरातील जय हिंद कॅम्पस शाळेच्या स्नेहसंमेलनच्या कार्यक्रमास मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख सातपुते यासमवेत सर्व शिक्षक व विद्यार्थी,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे
वॉटर कलर,सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे
9146702323
8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड,बीड

# नागतळा येथे आयोजित कार्यकर्ता मेळावा संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आष्टी विधानसभा मतदारसंघात दौरा.भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, भाजपा राष्ट्रीय सचिव लोकनेत्या पंकजाताई मुंडे, खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी कार्यकर्ता बैठक घेऊन संवाद साधत आहेत.खा.प्रितमताई मुंडेच लोकसभेच्या उमेदवार असून त्यांनी मोठ्या प्रमाणावर विकास केला असून पुन्हा एकदा संसदेत पाठवण्यासाठी निवडून द्यायचे आहे. मोदी सरकारने मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली आहेत.मोदी की गॅरंटी त्यांनी दिलेले आश्वासन पूर्ण केली आहेत.त्यामुळे पुन्हा मोदींना पंतप्रधान करण्यासाठी प्रितमताई मुंडे यांनी विजयी करायचं आहे असे आवाहन केले. मी ही मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर विकास केला असून पुढील २५ पिढ्यांची सोय केली आहे.वय झालय अस समजू नका तेवढ्याच जोमाने मी पण कामाला लागलो आहे.मागील निवडणुकीत भाजपातील लोकांनी गद्दारी केल्यामुळे पराभव झाला आता पराभवाचा वचपा काढण्यासाठी तुमच्या मदतीची गरज आहे. नागतळा येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात केले. लोकसभेच्या प्रितमताई आपल्या उमेदवार आहेत. निरीक्षक यांना बोललो आहे त्यांनाच उमेदवारी देण्यात यावी परंतु आपल्या तालुक्यात त्यांना नावे ठेवणारी पिलावळ आहे. .खासदार फंड आला नाही खा. मुंडे यांनी त्यांच्या काळात मोठ्या प्रमाणावर जिल्ह्याचा विकास झाला आहे.रेल्वे आली पुढे लवकरच धावेल,रस्ते, विविध विकास कामे केली मोदी सरकार कडून मोफत धान्य दिले जात आहे.भुमीहीन नागरिकांना धान्य विकत घेण कठीण आहे याचा नागरीकांना फायदा होत आहे.



पक्ष म्हणून भाजपमध्ये भेदभाव केला जात नाही.आष्टी पंचायत समितीत शेतकऱ्यांकडून पैसे घेतात विहरीसाठी रेट सुरू झाला आहे.पैसे कोण घेतय देयला नाही पाहिजे हे पैसे कुठे जातात यावर ही अखेर साहेब बोललेच १० ते १२ तारखेला आचारसंहिता लागणार आहे.मोदी सरकारच्या काळात शेतकऱ्यांच्या जिवनमानात सुधारणा झाली आहे.शेतकऱ्यांसाठी मुंबई ते दिल्ली पायी मोर्चा, शेतकऱ्यांच्या जमिनीसाठी पाय फुटले बोट तुटले प्रश्न मार्गी लावून घेतले मी मतदार संघातील तुमच्या २५ पिढ्यांची मुलांची सोय केली आहे.अनेक मुले, डॉक्टर, वकील, इंजीनियर, विविध क्षेत्रात घडले आहेत.मी ऐवढे काम करतो मग मला मत दिले पाहिजे ३० ते ३५ हजार मुले मी सुरु केलेल्या शिक्षण संस्थेत शिकतात जन्मला आलेल्या मुलांपैकी ७० टक्के मुले आपल्या शाळेत शिकतात मला पैसे कमवायचे असते तर बिअर बार काढले असते मी स्वतः २५ किमी शाळेत पायपीट करून शिकलो भविष्यात मुलाबाळांच्या शिक्षणासाठी गैरसोय नको म्हणून मी शाळांची सोय केली,रस्ते,पाझर तलाव,विहिर, वैयक्तिक योजना विकास कामे केली कुणी समजू नये वय झालय जोमाने काम करतोय आपल्या बैठकीचा प्रितमताईंना फायदा होणार आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com